## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- ३२४९/२०२१

अपिलार्थी, श्री.श्रीनिवास अनंत घाणेकर
८०१, ओम श्रीकांत सदर,
तेलवणे हॉस्पीटल समोर, आग्रारोड
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्य स्वच्छता अधिकारी,
घनकचरा व्यवस्थापन विभाग,कल्याण डोंबिवली
महानगरपालिका, कल्याण, शंकरराव चौक,
कल्याण (प), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी उप आयुक्त,
घनकचरा व्यवस्थापन विभाग, कल्याण डोंबिवली
महानगरपालिका, कल्याण, शंकरराव चौक,
कल्याण (प), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०८.०४.२०२४

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०७.०९.२०२० | -- | १८.१०.२०२१ | -- |

अपिलार्थी यांनी दि. १८.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *" कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०८.०४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.रामदास कोकरे यांचे प्रतिनिधी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.अतुल वसंत पाटील, उप आयुक्त (घ.क.व्य.) कल्याण डोंबिवली महानगरपालिका उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अगस्तिन घुटे व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.वसंत देगलूरकर, मुख्य स्वच्छता अधिकारी, घनकचरा व्यवस्थापन विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" दि.०१ जानेवारी ते अर्ज दिनांकापर्यंत महापालिकेच्या आधारवाडी डंपिंग येथे येणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्याच्या गाड्यांचे वजन करुनच कचरा स्विकारला जातो असे समजते.*

*ह्या कालावधीत महापालिकेच्या आधारवाडी डंपिंग येथे प्रत्येक दिवशी किती ओला व किती सुका कचरा तसेच प्रत्येकं दिवशी एकंदर किती कचरा स्विकारला गेला त्याची दिनांक निहाय माहिती मिळावी. "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये *" माहिती प्राप्त झालेली नाही "*असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१४.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे माहिती दिलेली आहे.

*“उपलब्ध वजनाच्या अभिलेखात सुका व ओला कचरा असून, विगतवारीचा उल्लेख नाही. वजन काट्यावरील वजन पावत्या सोबत पुरविण्यात आलेल्या आहे.*

*कालावधी- १ जानेवारी २०२० ते ०९ सप्टेंबर २०२० (एकूण पृष्ठ संख्या-२५६)”*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान असे सांगितले की, त्यांना मार्च २०२४ मध्ये त्यांनी दि.०७.०९.२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये मागीतलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये नेहमीच माहिती अधिकार कायद्याअंतर्गत माहिती मागविण्यासाठी केलेल्या आर्जवर तातडीने कार्यवाही करुन माहिती पुरविली जात नाही. आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केल्यानंतर माहिती पुरविण्यात येते. तरी संबंधित अधिकाऱ्यांना आयोगाने याबाबत ताकीद देण्यात यावी.

विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान सांगितले की, कोव्हीड-१९ या महामारीच्या कालावधीत ते व्यस्त असल्यामुळे त्यांना अपिलार्थी यांना माहिती पुरविणे शक्य झाले नसून, विलंब झाला आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, कोव्हीड-१९ या महामारीचा कालावधी हा साधारणपणे सन २०२१-२०२२ मध्ये संपलेला आहे. त्यानंतर नेहमचे कामकाज सुरु झालेले आहे. हा कालावधी संपल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना तातडीने माहिती उपलब्ध करुन दिली असती, तर त्यांचा हा युक्तीवाद मान्य करता आला असता. द्वितीय अपिलाच्या सुनावणीची नोटीस मिळाल्यानंतर त्यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविली आहे. म्हणजेच माहिती न पुरविण्यासाठी त्यांच्याकडे कोणतेही योग्य कारण उपलब्ध होते असे, दिसून येत नाही. अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबासाठी प्रति दिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीस तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आपला खुलासा सादर करावा. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तथा मुख्य स्वच्छता अधिकारी, घनकचरा व्यवस्थापन विभाग,कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०७.०९.२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबामुळे, त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबासाठी प्रति दिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा दि.०६.०५.२०२४ रोजीच्या सुनावणीच्या दिवशी त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. **सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.०६.०५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

(शेखर चन्द्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०८ एप्रिल, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्य स्वच्छता अधिकारी, घनकचरा व्यवस्थापन विभाग,कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण, शंकरराव चौक, कल्याण (प), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

-यांना प्रत

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्य स्वच्छता अधिकारी,

**संगणक-11**

घनकचरा व्यवस्थापन विभाग,कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण, शंकरराव चौक, कल्याण (प),
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१. यांचे मार्फत प्रत रवाना.